नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २२८ | Issue - 228 | वार बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ | Blow- Wednesday Date 7 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# टेम्पो ट्रॅव्हलर-रिक्षाच्या भीषण अपघातात ५ भाविक ठार

## अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी-शनीशिंगणापूर मार्गावर घडली दुर्घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर: अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी-शनीशिंगणापूर मार्गावर आज मृत्यूने भीषण तांडव घातले. उंबरे गावाच्या हद्दीत असलेल्या तांबे पेट्रोलपंपाजवळ भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर आणि रिक्षाचा अत्यंत भीषण अपघात झाला. या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या दुर्घटनेत रिक्षातील पाच प्रवाशांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, अनेक जण रक्ताच्या थारोळ्यात गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, एक टेम्पो ट्रॅव्हलर शनीशिंगणापूरच्या दिशेने प्रचंड वेगात जात होता. याच वेळी राहुरीकडून एक प्रवासी रिक्षा समोरून येत होती. तांबे पेट्रोलपंपाजवळ या दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, रिक्षा चेंडू सारखी हवेत उडाली आणि तिचा अक्षरशः चक्काचूर झाला. धडकेनंतर अनियंत्रित झालेला टेम्पो ट्रॅव्हलरही रस्त्याच्या कडेला पलटी झाला.

घटनास्थळी रक्ताचा सडा आणि आक्रोश; वाहतूक ठप्प, परिसरात हळहळ

अपघाताचा आवाज होताच उंबरे गावातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. तिथे पडलेले रक्ताचे सडे आणि प्रवाशांचा आक्रोश पाहून उपस्थितांचेही डोळे पाणावले. रिक्षामध्ये बसलेल्या पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. टेम्पो ट्रॅव्हलरमधील अनेक पर्यटकही या अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. स्थानिकांनी जीवाची पर्वा न करता जखमींना बाहेर काढले आणि रुग्णवाहिकेच्या मदतीने तातडीने राहुरी व अहमदनगर येथील रुग्णालयात दाखल केले.

या भीषण अपघातामुळे शनीशिंगणापूर रोडवरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तातडीने पंचनामा केला आणि क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला सारून वाहतूक सुरळीत केली. मृतांची अधिकृत ओळख पटवण्याचे काम पोलीस प्रशासनाकडून युद्धपातळीवर सुरू आहे.

शनीशिंगणापूर मार्गावर अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रस्त्यांवरील वाढती वेगमर्यादा आणि नियमांचे उल्लंघन निष्पाप जीवांच्या जीवावर उठत आहे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

# साहेबांचे नेतृत्व दूरदृष्टीचे नेतृत्व, अजित पवारांकडून राष्ट्रवादीतील रेष मिटवण्याचे संकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या महानापालिका निवडणुकीच्य निम्ताने दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढत आहेत. त्यामुळं पुढच्या काळात दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार का? असा प्रश्न पडत आहे. याच पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मागचं झालं गेलं गंगेला मिळालं, आता आपण एकोप्याने काम करायचं आहे. साहेबांचं नेतृत्व म्हणजे पुढची दृष्टी असणारं नेतृत्व आहे, असे अजित पवार म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळं दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. आम्ही यावेळेस तुतारी आणि घड्याळाला बरोबर घेतलं आहे. आम्हाला वाद घालायचा नाही. मागचं झालं गेलं गंगेला मिळालं, आता आपण एकोप्याने काम करायचं आहे. साहेबांचं नेतृत्व म्हणजे पुढची दृष्टी असणारं नेतृत्व आहे असे अजित पवार म्हणाले. केंद्राचं आणि राज्याचं राजकारण महापालिकेत आणायचं नाही. तिथलं राजकारण तिथं ते इथं आणायचं नाही असे अजित पवार म्हणाले.

पिंपरी चिंचवड शहरातील भ्रष्टाचाराचा आका कोण? असा सवाल करत त्या आकाला संपवायचं आहे, असा एल्गार अजित पवार यांनी केला. पिंपरी चिंचवड शहरातील भ्रष्टाचाराचा आका आपल्याला संपवायचा आहे. त्या आकाला आपल्याला त्याची जागा दाखवायची आहे असे अजित पवार म्हणाले. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजीत करण्यात आलेल्या सभेत अजित पवार बोलत होते. अजित पवार यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. २५ वर्षांची आमची कारकिर्द पाहा आणि यांची गेल्या ८ ते ९ वर्षांच्या कारकीर्द पाहा असे अजित पवार म्हणाले. आमच्याकडे सत्ता होती तरी आम्ही सत्तेचा माज येऊ दिला नाही. सत्तेची मस्ती कधी येऊ आम्ही दिली नाही असे अजित पवार म्हणाले अनेक समाजाला आण्ही प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली. आपल्याला पिपंरी चिंचवड शहराला देशातील पहिल्या क्रमांकावर घेऊन जायचं आहे. त्यासाठी माझ्या विचारांची माणसे विजयी करा असे आवाहन यावेळी अजित पवार म्हणाले.

# ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा निकाल अजून बाकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवडमध्ये भाजपवर टीका केली होती. ज्यांनी ७० हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला त्यांच्याचसोबत आपण सत्तेत आहोत, असं अजित पवार म्हणाले होते. तसेच त्यांनी भाजवर पिंपरी चिंचवडमध्ये भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप केला होता. त्यांच्या आरोपांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात नुकतंच प्रत्युत्तर दिल्याचं बघायला मिळालं. त्यानंतर आता भाजपचे नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी बावनकुळे यांनी अजित पवार यांना मोठा इशारा दिला आहे.

**चंद्रशेखर बावनकुळेंचा अजित पवारांना इशारा**



अजित दादांना मी काही सूचना देईन किंवा सांगेल एवढा मोठा मी नाही. पण आमच्या महायुतीच्या समन्वय समितीत, ज्या समितीत मी स्वत: आहे, त्या समितीचं ठरलं होतं की, मित्रपक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत लढताना कोणत्याही प्रकारची वैयक्तिक टीका होणार नाही याची काळजी घ्यावी. आम्ही समन्वय समितीने सूचित केल्यानुसार काळजी घेतली. पण अजित दादांनी ती काळजी घेतली नाही, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

अजित पवार असं का बोलले? ते मला माहिती नाही. पण अजित दादांनी ठरल्याप्रमाणे वागायला पाहिजे होतं. मी आधीच सांगितलं होतं. ते कसे वागले, काय वागले ते माहिती नाही. पण अजित पवारांनी खऱ्या अर्थाने असं बोलायला नको होतं. ते राज्याचे महत्त्वाचे नेते आहेत. त्यांना मी फार काही सल्ला देणार नाही. पण पिंपरी चिंचवडमध्ये अनेक वर्ष अजित दादाही सत्तेत होते. आता मागचे पान पालटले तर त्यांनाही बोलता येणार नाही. त्यामुळे आमची पाने पलटवण्याची इच्छा नाही. अजित दादांनी कृपया समन्वय समितीत ठरल्याप्रमाणे ते पुढे वागतील अशी आशा आहे, असं बावनकुळे म्हणाले.

ते काही खूप अभिमानास्पद नाही. शेवटी कोर्टात जी काही केस सुरु आहे, जे काही निकाल येतील त्यावरच आपण पुढे जाऊ. शेवटी कोर्टाचे निकाल अजून लागलेले नाहीत. त्यामुळे अजित पवारांनी अशा बाबी एवढ्या छोट्या निवडणुकीत काढणे आणि महायुतीत मतभेद, मनभेद तयार करणे हे योग्य नाही. बोलण्यासारखं खूप आहे, पण आज तो दिवस नाही, असा इशारा बावनकुळे यांनी यावेळी दिला.

# आरबीआय वर्षभरात रेपो रेट ५० बेसिस पॉईंटने घटवण्याची शक्यता, रिपोर्टमध्ये दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं २०२५ या वर्षात रेपो रेटमध्ये मोठ्या प्रमाणात कपात केली आहे. यामुळं गृहकर्जदारांना मोठा दिलासा आहे. रिझर्व्ह बँकेनं २०२५ मध्ये १२५ बेसिस पॉईंटमध्ये कपात केली आहे. यामुळं गृहकर्जाचे व्याज दर कमी केल्यानं गृहकर्जदारांना २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणात मिळाला. आयआयएफल कॅपिटलच्या रिपोर्टनुसार रिझर्व्ह बँकेला रेपो रेटमध्ये ५० बेसिस पॉईंटनं कपात करण्यासाठी वाव आहे.

ॉआयआयएफएलच्या रिपोर्टनुसार रेपो रेट आणि मुलूभूत सीपीआय महागाई नियंत्रणात असल्यानं आरबीआयला व्याज दर कपातीसाठी वाव आहे. रेपो रेटमधील कपात आणि त्या सोबतच अनियंत्रीकरणामुळं विकासाला चालना मिळेल. बँकांची कर्जाची स्थिती देखील सुधारु शकते.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं डिसेंबरला पतधोरण जाहीर करत असताना २५ बेसिस पॉईंटची कपात केली आहे. त्यामुळं रेपो रेट सद्या ५.२५ टक्क्यांवर आला आहे. आरबीआयनं वर्षभरात रेपो रेटमध्ये १२५ बेसिस पॉईंटची कपात केली आहे. आरबीआयमध्ये संजय म्हलोत्रा गव्हर्नर म्हणून येण्यापूर्वी रेपो रेट ६.५० टक्के होता. तिथून रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर आला आहे. आता रेपो रेटमध्ये येत्या वर्षभरात ५० बेसिस पॉईंटची कपात होईल, असा अंदाज वर्तवल्यास रेपो रेट ४.७५ टक्क्यांवर येईल.

आरबीआयकडून करण्यात आलेली रेपो रेटमधील कपात आणि आर्थिक सुधारणा यामुळं भारताचा जीडीपी २०२६ मध्ये वेगानं वाढेल, असा अंदाज आहे. आयआयएफएल कॅपिटलकडून व्याज दरात ५० बेसिस पॉईंट कपातीला वाव असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

रेपो रेटमध्ये आरबीआयनं येत्या काळात म्हणजेच २०२६ मध्ये ०.५० टक्क्यांची कपात केल्यास बँकांना कमी व्याज दरानं कर्ज वितरण करावं लागेल. याचा फायदा जुन्या आणि नव्या कर्जदारांना मिळेल. गृह कर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाचे व्याज दर कमी झाल्यानं ईएमआयची रक्कम कमी होईल. कंपन्यांसाठी कमी व्याज दरात कॉर्पोरेट लोन मिळेल. मात्र, दुसरीकडे मुदत ठेव ठेवणाऱ्या ग्राहकांना कमी व्याज दर मिळेल.

२०२५-२६ मध्ये आरबीआयच्या पतधोरण समितीच्या ६ बैठकांपैकी ५ बैठका पार पडल्या आहेत. आता सहावी बैठक ४ ते ६ फेब्रुवारीला होणार आहे. म्हणजेच केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर होणार आहे. आरबीआयनं आयआयएफएल कॅपिटलच्या रिपोर्टनुसार व्याज दरात कपात केल्यास अर्थव्यवस्थेच्या वाढीला वेग मिलेल. बँकांची कामगिरी देखील सुधारु शकते. दुसरीकडे कच्चा तेलाच्या किमती ६५ डॉलर प्रति बॅरल राहण्याची शक्यता असल्यानं महागाईचं संकट देखील कमी होऊ शकतं.

**महायुतीच्या नेत्यांमध्ये एकमेकांवर हल्लाबोल**

# वीर सावरकरांचा विरोध आम्हाला मान्य नाही : फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जळगाव : राज्यात महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने राजकीय वातावरण तापलं असून महायुतीमधील नेतेही एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीचं भाजपला आव्हान आहे. त्यामुळे, अजित पवारांकडून भाजपवर हल्लाबोल केला जात आहे. तर, भाजपकडूनही अजित पवारांवर पलटवार केला जात आहे. मात्र, अजित पवारांनी टीका करताना विचार करावा, अशी भूमिकाही काही भाजप नेत्यांनी घेतल्याचं दिसून येत आहे. त्यातच, भाजपने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मुद्दयावरुन अजित पवारांना घेरले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षालासुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील, असं मंत्री आणि भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी म्हटलं होतं. आता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तीच भूमिका मांडली आहे.




राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा कालही शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणारा होता, आजही आहे आणि उद्याही त्याच विचारांवर चालणारा पक्ष असेल, असे अजित पवारांनी म्हटले होते. त्यानंतर, राजकीय वर्तुळातून भाजपकडून टीका करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रचार सभादरम्यान जळगावमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयावर भाष्य करत भूमिका मांडली. त्यामध्ये, अजित पवारांनाही मित्रत्वाचा सल्ला दिलाय. मला अस वाटत की, अजित पवार यांनी वीर सावरकरांचे विचार विरोध करण्याचे कारण नाही. त्यांनी तसं केल्याचं मला माहिती नाही, त्यांनी तसं केलं असेल का? आमची भूमिका पक्की, वीर सावरकरांचा विरोध आम्हाला मान्य नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट शब्दात सांगितलं.

निवडणुकीसंदर्भाने राज्यात भाजपने एक पॉलिसी ठरवली आहे, त्यात एक दोन ठिकाणी अपवाद झाले. वेळेवर अल्ट्रनेट उमेदवार आणता आला नाही, दुसरीकडे आम्ही तसं काही केलेले नाही, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी घराणेशाहीवरुन होणाऱ्या टीकेवर भाष्य केलं.

दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्याबद्दल भाजप प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या वक्तव्यावरही देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडली. ''रवींद्र चव्हाण यांनी दिलगिरी व्यक्त केलेली आहे, स्पष्टीकरणही दिले आहे. विलासराव यांच्याबद्दल पक्षविरहित सर्वांना आदर आहे, त्यांच्या स्मृती पुसल्या जाणार नाहीत. कुणीही निवडणुकीच्या काळात दिलगिरी व्यक्त करत नाही, त्यांनी केली आहे.'', असे फडणवीसांनी म्हटले.

आम्ही स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांचे भक्त आहोत. आम्ही आणि आमचा पक्ष सावरकरांच्या विचारांवर चालणारे आहोत. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षालासुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील, असं मंत्री आशिष शेलार यांनी म्हटलं. तसेच तुम्ही याल तर तुमच्याबरोबर आणि नाही आलात तर तुमच्याविना... विरोधात शिरला तर विरोधात.. आम्ही आमचं काम करत राहू, असा इशाराच आशिष शेलार यांनी अजित पवारांना दिला. त्यामुळे महापालिका निवडणुकीच्या आधी भाजपा आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये जुंपण्याची शक्यता आहे.

# संसदेत आवाज उठवणार, बिनविरोध निवडणुकांवरुन सुप्रिया सुळेंचा हल्लाबोल



मुंबई : महानगर पालिका निवडणुकीमध्ये भाजपसह, शिंदे गट आणि मागून अजित पवार गटाची बिनविरोध उमेदवार निवडून आणण्यासाठी स्पर्धाच लागली आहे. मात्र ही स्पर्धा अघोरी पद्धतीचा असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. याच मुद्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जे काही घडत आहे, ते माझ्यासह राज्यातील जनतेच्या मनाला अस्वस्थ करणारे असल्याचे सुळे म्हणाल्या. छजढ चा पर्याय उपलब्ध असूनही मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात आहे असल्याचे सुळे म्हणाल्या.

तब्बल ७ ते ८ वर्षांनंतर निवडणुका होत आहेत. तरीसुद्धा मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडणुका होत आहेत. नोटा चा पर्याय उपलब्ध असूनही मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात असल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या. यामध्ये धमकीचे प्रकार, बंदुकीच्या जोरावर दहशत, पैशांचा अतोनात वापर, उमेदवारी अर्ज माघारीसाठी विविध प्रकारचा दबाव, ब्लॅकमेलिंग, बोगस मतदान आणि मतदारांना दिली जाणारी प्रलोभने असे अनेक गंभीर प्रकार माध्यमांतून सातत्याने समोर येत असल्याचे सुळे म्हणाल्या. हे सर्व घडत असताना निवडणूक आयोगाचे दुर्लक्ष अधिकच चिंताजनक आहे. सुदृढ लोकशाहीसाठी हे अतिशय धोकादायक आहे. मी याबाबत यापूर्वीही संसदेत आवाज उठवला आहे, आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी पुढेही हे मुद्दे सातत्याने मांडत राहावे लागणार आहेत असे सुळे म्हणाल्या. मनपा निवडणुकीमध्ये चांदा ते बांदा भाजप, शिंदे गट आणि मागून अजित पवार गटाची बिनविरोध उमेदवार निवडून आणण्यासाठी स्पर्धाच लागली. मात्र ही स्पर्धा अघोरी पद्धतीचा असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला.

## संपादकीय....

### महायुतीत कुस्ती

राज्यात महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने राजकीय वातावरण तापलं असून महायुतीमधील नेतेही एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीचं भाजपला आव्हान आहे. त्यामुळे, अजित पवारांकडून भाजपवर हल्लाबोल केला जात आहे. तर, भाजपकडूनही अजित पवारांवर पलटवार केला जात आहे. मात्र, अजित पवारांनी टीका करताना विचार करावा, अशी भूमिकाही काही भाजप नेत्यांनी घेतल्याचं दिसून येत आहे. त्यातच, भाजपने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मुद्दयावरुन अजित पवारांना घेरले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षालासुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील, असं मंत्री आणि भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी म्हटलं होतं. आता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तीच भूमिका मांडली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा कालही शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणारा होता, आजही आहे आणि उद्याही त्याच विचारांवर चालणारा पक्ष असेल, असे अजित पवारांनी म्हटले होते. त्यानंतर, राजकीय वर्तुळातून भाजपकडून टीका करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रचार सभादरम्यान जळगावमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयावर भाष्य करत भूमिका मांडली. त्यामध्ये, अजित पवारांनाही मित्रत्वाचा सल्ला दिलाय. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवडमध्ये भाजपवर टीका केली होती. ज्यांनी ७० हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला त्यांच्याचसोबत आपण सत्तेत आहोत, असं अजित पवार म्हणाले होते. यावेळी बावनकुळे यांनी अजित पवार यांना मोठा इशारा दिला आहे. मित्रपक्षांमध्ये मैत्रीपूर्ण लढत लढताना कोणत्याही प्रकारची वैयक्तिक टीका होणार नाही याची काळजी घ्यावी. आम्ही समन्वय समितीने सूचित केल्यानुसार काळजी घेतली. पण अजित दादांनी ती काळजी घेतली नाही. एकंदरीत महायुतीत कुस्ती चालू असल्यासारखे वाटते.

## नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीमुळे तळा शहराच्या वैभवात भर : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड/अलिबाग (जिमाका): नगरपंचायतीची प्रस्तावित प्रशासकीय इमारत ही तळा शहराच्या वैभवात भर घालणारी, दर्जेदार आणि भविष्याचा विचार करून उभारण्यात येईल, तसेच या प्रशासकीय इमारतीमुळे नागरिकांना एकाच छताखाली विविध सेवा–सुविधा उपलब्ध होणार असून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

नागरी सेवा व सुविधा योजनेअंतर्गत तळा नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचा भूमिपूजन सोहळा उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते तळा येथे पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, नगरपंचायत सदस्य–सदस्या, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल आदी मान्यवर उपस्थित होते.




उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, ही भूमी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झाली असून ऐतिहासिक वारसा लाभलेल्या तळा तालुक्याला विशेष महत्त्व आहे. तळागड किल्ला हा मराठा साम्राज्याच्या काळात टेहळणी व संरक्षणाचे महत्त्वाचे केंद्र होते. या ऐतिहासिक साक्षीने नटलेला तळा परिसर आज हिरवीगार शेती, निसर्गसौंदर्य आणि सर्वांच्या प्रयत्नांमुळे विकासाच्या नव्या वाटेवर वाटचाल करत आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी आणि पालघरपर्यंत पसरलेले निसर्गसौंदर्य, समुद्रकिनारे, घनदाट हिरवी झाडी व पावसाळ्यातील धबधबे यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत.

सरकारच्या माध्यमातून राज्याचा सर्वांगीण विकास, प्रगती आणि लोकांचे प्रश्न सोडविण्यावर भर देण्यात येत आहे. उद्योगातून तरुणांच्या हाताला रोजगार मिळण्याबरोबर बचत गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उखखखढ प्रकल्पामध्ये टाटा कंपनी आणि राज्य सरकारच्या माध्यमातून तरुणांना आधुनिक शिक्षण दिले जात आहे, ख चा वापर जगाने स्वीकारला आहे. आपले तरुण या बदलासाठी तयार झाले पाहिजेत, यासाठी सरकार काम करत आहे.

तळा नगरपंचायतीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी शासनाकडून ८.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी ५० टक्के निधी वितरित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. उभारण्यात येणारी प्रशासकीय इमारत अत्यंत उत्कृष्ट दर्जाची असावी व नागरिकांची कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अशा सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या. ग्रामदैवत आई चंडिका माता मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, सन–२०१९ मध्ये राज्यमंत्री म्हणून संधी मिळाल्यानंतर वावे धरणातून तळा शहरासाठी १३ कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर करून आणली. ही योजना पुढील सहा महिन्यांत पूर्ण होऊन संपूर्ण तळा शहराला शुद्ध पाणी उपलब्ध होणार आहे. उपमुख्यमंत्री पवार यांच्या माध्यमातून तळा तालुक्यातील पुसाटी गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी सुमारे ८५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच, तळागड किल्ल्याचा ताबा केंद्र सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे घेऊन गड विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, तळा तालुक्यातील नागरिकांचे होणारे स्थलांतर ही चिंतेची बाब आहे. परंतु, येथे पुढील काळात येथील परिसरात उद्योगाच्या माध्यमातून ही दूर करण्यात येईल.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२४–२५ अंतर्गत मोदी तलावाच्या सुशोभिकरण कामाचे भूमिपूजन पार पडले. यावेळी नगरपंचायत परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उष्ण वातावरणात मान्सून कमकुवत होण्याची शक्यता; पाऊस, शेती आणि पाण्याच्या उपलब्धतेवर थेट परिणाम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : तापमान आणि आर्द्रता वाढली म्हणजे मान्सून अधिक सक्षम होतो, असा एक समज आहे. मात्र सुमारे पाच कोटी पन्नास लाख वर्षांपूर्वी ईओसिन काळात पृथ्वी आजच्या तुलनेत खूप गरम होती.

तसेच, वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण जास्त असताना मान्सून कमकुवत होता, असे समोर आले आहे. यासंदर्भातील संशोधन आंतरराष्ट्रीय पेलओशनोग्राफी आणि पेलक्लायमेटॉलॉजी या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे. हा अभ्यास मराठी संशोधक डॉ. प्रतीक कड यांच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय संशोधकांनी केला आहे.

पृथ्वीवरील तापमान वाढले, म्हणजे समुद्र आणि जमिनीच्या तापमानात फरक वाढेल. त्यामुळे मान्सूनचे कमी उंचीवरील वारे मजबूत होतील, असा एक समज आहे. मात्र ईओसिन काळात समुद्र आणि जमीन यांच्या तापमानात फरक असतानाही मान्सून प्रणाली मजबूत नव्हती. त्यानंतरच्या काळात मान्सून अधिक मजबूत झाला. जमिनीवर उष्णता वाढलेली असताना या उष्णतेमुळे उष्ण कटिबंधातील वातावरण अधिक स्थिर झाले.

वातावरणाच्या वरच्या थरात जास्त उष्णता साचल्यामुळे वरच्या दिशेने जाणारी हवा कमी झाली, ढगनिर्मिती आणि पावसाची प्रक्रिया दडपली गेली, आणि संपूर्ण वातावरणातील उलथापालथ कमजोर झाली. कार्बन डायऑक्साइडमुळे वाढलेल्या उष्णतेच्या परिस्थितीत मजबूत मान्सून वारे तयार होण्यासाठी आवश्यक असलेली ऊर्जा मर्यादित झाली, असे या संशोधनात समोर आले आहे.

‘या संशोधनाचा उपयोग भविष्यातील हवामान बदल समजून घेण्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. तापमान आणि ओलावा वाढला म्हणजे मान्सून अधिक मजबूत होईल, अशी चिन्हे नाहीत. जास्त उष्णतेमुळे वातावरण अधिक स्थिर होते आणि त्यामुळे मान्सूनचे वारे कमकुवत होऊ शकतात,’ असे या संशोधनातून समोर आल्याचे डॉ. प्रतीक कड यांनी सांगितले. ‘याचा थेट परिणाम पावसाच्या स्वरूपावर, शेतीवर आणि पाण्याच्या उपलब्धतेवर होऊ शकतो. भूतकाळातील अतिउष्ण पृथ्वीचा अभ्यास करून आपण भविष्यातील मान्सून कसा बदलेल, याचा अधिक विश्वासार्ह अंदाज लावू शकतो. त्यामुळे धोरण आखणी, जलव्यवस्थापन आणि शेती नियोजनासाठी हे निष्कर्ष उपयोगी ठरतील,’ असेही ते म्हणाले.

## पशुसंवर्धन विभागाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी २४ जानेवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कडील सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद उपकर योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजनेतील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात यासाठी पात्र लाभार्थीनी २४ जानेवारी २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद डॉ. व्ही. डी. येवले यांनी केले आहे.

जिल्हा परिषद उपकर योजना

- आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या शेतमजुर व शेतकऱ्यांना ७५% अनुदानावर ४ शेळया व १ बोकड वाटप करणे.
- पशुपालकांना मिल्कीग मशिन ५०% अनुदानावर पुरविणे.

वरील योजनांसाठी पात्र लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात येत असून सदरचे अर्ज दिनांक ५ जानेवारी २०२६ पासून पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती तसेच सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या (www.zpsolapur) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख दिनांक २४ जानेवारी २०२६ आहे.

तरी इच्छुक पात्र लाभार्थींनी वरील योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जि. प. सोलापूर तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर कूलदीप जंगम, मा. उपाध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जि. प. सोलापूर तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद संदीप कोहिणकर व जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा परिषद डॉ. व्ही.डी. येवले यांनी केले आहे.

## महानायक दिनदर्शिका प्रकाशित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब / प्रतिनीधी : सुधाकर रणदिवे, महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन च्या वतीने प्रत्येक वर्षी प्रकाशित होणारा महानायक दिनदर्शिका मोहेकर मल्टीस्टेट चे चेअरमन व मोहेकर उद्योग समुहाचे मालक हनुमंत तात्या मडके यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.



त्यावेळी संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन, श्रीकांत मडके, इमरान शेख उपस्थित होते.

## पत्रकारांनी निरपेक्ष व निपक्षपातीपणे न्यायिक भावनेतून पत्रकारिता करावी : नगरसेवक मारुती खारव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी /एस. के. गायकवाड : वृत्तपत्र हे समाजाचा अरसा असून या जाणिवेतूनच मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांनी सर्वप्रथम दर्पण नावाचे मराठी वृत्तपत्र चालवले असून पत्रकाराकडे समाज हा न्यायिक भावनेतून न्याय मिळण्याच्याअपेक्षेने आदराने बघतो तेंव्हा पत्रकारांनी निरपेक्ष व निपक्षपातीपणे पत्रकारिता करावी असे प्रतिपादन नळदुर्ग नगरीचे नूतन नगरसेवक तथा डॉ.आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल नळदुर्ग ता. तुळजापूर चे संस्थापक सामाजिक कार्यकर्ते मारुती कारवे यांनी येथे बोलताना केले.



दि.६ जानेवारी २०२६ रोजी मराठी वृत्तपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती पत्रकार दिन म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने डॉ.आंबेडकर इंग्लिश मीडियम स्कूल नळदुर्ग येथे मोठ्या उत्साहाने व विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार संघाचे तुळजापूर तालुका अध्यक्ष तथा राज्य कार्यकारणी सदस्य अरुण लोखंडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नूतन नगरसेवक मारुती कारवे हे होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मारुती खारवे बोलत होते तर अध्यक्षिय स्थानावरून बोलताना अरुण लोखंडे म्हणाले की महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या सर्व सदस्यांनी प्रामाणिकपणे निष्ठेने व निर्भीडपणे वास्तववादी लेखन करून निष्कलंकपणे पत्रकारिता करण्याचा प्रयत्न करावा.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ तालुका शाखा तुळजापूरच्या वतीने नूतन नगरसेवक मारुती खारवे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला तर नगरसेवक मारुती खारवे यांच्या वतीने उपस्थित पत्रकार संघाच्या सर्व सदस्यांचा पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन पत्रकार एस.के. गायकवाड यांनी केले. यावेळी पत्रकार विजय पिसे, ईरफान काझी,संजय पिसे,अकाश अलकुंटे,राहुल कांबळे, विठ्ठल सोनटक्के,पत्रकार मित्र प्रल्हाद भोसले उपस्थित होते.

## टॅरिफ धमकीचा परिणाम, भारतीय बाजारात शुकशुकाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : भारतीय शेअर मार्केट गेल्या काही महिन्यांपासून सतत दबावाखाली ट्रेड करत आहे. बाजारातील दबावाची अनेक कारणे असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पहिले, सततच्या तेजीनंतर नफावसुली होत आहे आणि दुसरे म्हणजे, परदेशी गुंतवणूकदार सध्या भारतीय बाजारापासून दुरावत असून याशिवाय, बाजार अमेरिकेसोबतच्या व्यापार करारावरही बारकाईने लक्ष ठेवून आहे.

अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या लष्करी कारवाईनंतर जागतिक बाजारात अशांततेची भीती व्यक्त केली जात होती.सामान्यतः अशा घडामोडींमुळे शेअर बाजारात घबराट निर्माण होते, जोखीम घेण्याची भावना कमकुवत होते आणि गुंतवणूकदार सुरक्षित मालमत्तेकडे पळून जातात. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या घटनेचा भारतीय बाजारासह जागतिक मार्केटवर कोणताही विशेष परिणाम झाला नाही. या दरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारतीय आयातींवर टॅरिफ वाढवण्याची उघड धमकी दिली असून यामुळे बाजारातील गुंतवणूकदारांनी सावध भूमिका घेतली.

दुसरीकडे, सलग दुसऱ्या दिवशी देशांतर्गत बाजारात शांतता पसरली. सेन्सेक्स आणि निफ्टी बाजाराच्या सुरुवातीला सपाट ट्रेंड करत असताना गुंतवणूकदारांमध्ये अलीकडच्या घडामोडींमुळे संभ्रम पाहायला मिळत आहे. त्याचवेळी, आता बाजारातील गुंतवणूकदार आता तिमाही निकाल आणि अर्थसंकल्पाकडे लक्ष ठेवून असतील. दुसरीकडे करन्सी बाजारात सोमवारच्या ९०.२८ डॉलरच्या तुलनेत रुपया ९०.२१ डॉलरवर उघडला.

कच्च्या तेलाच्या किमती देशांतर्गत बाजारातील शांततेमागचे आणखी एक महत्त्वाचं कारण आहे. मध्य–पूर्व किंवा कोणत्याही मोठ्या तेल उत्पादक देशात तणाव वाढल्यास कच्च्या तेलाच्या किमती सर्वात आधी वाढतात, ज्यामुळे भारतासारख्या मोठ्या कच्च्या तेलाच्या खरेदीदारासाठी मोठा धोका निर्माण होतो.

मात्र, यावेळी ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल ६१ च्या आसपास स्थिर राहिल्या असून त्यात कोणतीही तीव्र वाढ झाली नाही किंवा पुरवठ्याला कोणताही धक्का बसला नाही. अगदी जझएउ+ देशांनीही मार्चपर्यंत कच्च्या तेलाचे उत्पादन पातळी राखण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे बाजाराला असे सूचित होते की सध्या पुरवठा–बाजूचे कोणतेही मोठे संकट नाही.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दिल्लीत रंगणार अस्सल सोलापुरी 'हुरडा पार्टी' आणि मराठमोळी संक्रांत महोत्सव

## हुरडा किंग काशीनाथ भतगुणकी यांच्या ड्रीम फाउंडेशन बसव संगम शेतकरी गट यांना हुरडा पार्टीसाठी महाराष्ट्रातून विशेष निमंत्रण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत सध्या कडाक्याच्या थंडीचा जोर वाढला असून धुक्याची चादर पसरली आहे. अशा वातावरणात दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीची ऊब देण्यासाठी कस्तुरबा गांधी मार्ग स्थित नवीन महाराष्ट्र सदनात अस्सल सोलापुरी 'हुरडा पार्टी' आणि 'मकर संक्रांत महोत्सवा'चे ०९ ते ११ जानेवारी या कालावधीत दु. १२ ते ९.३० या वेळेत आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती आर. विमला यांनी दिली.या हुरडा पार्टी साठी ड्रीम फाउंडेशनच्या बसव संगम शेतकरी गटाला निमंत्रण आले असून सोलापुरातून ५ शेतकरी व ७ महिला बुधवार दिनांक ७ जानेवारी रोजी सर्व हुरडा साहित्य घेऊन रेल्वेने व विमानाने जाणार असल्याचे हुरडा पार्टी समन्वयक बसव संगम शेतकरी गटाचे कार्याध्यक्ष काशीनाथ भतगुणकी व जिल्हा कृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिले,



महाराष्ट्र सदनात डिसेंबर महिन्यात पार पडलेल्या 'महाराष्ट्र खाद्य महोत्सवा'ला दिल्लीकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, आता विशेषतः हिवाळी हंगामाची मेजवानी म्हणून 'हुरडा पार्टी'चे आयोजन करण्यात आले आहे.

**संक्रांतीचा गोडवा आणि अस्सल सोलापुरी हुरड्याचा खमंग स्वाद**

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या महोत्सवात 'तिळगूळ' आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. यामध्ये अस्सल सोलापूरी हुरडा, शेंगा चटणी, गावरान बोर, ऊस, डहाळे, सेंद्रिय गुळ, सोलापुरी मका चिवडा, स्पेशल फरसाण, शेव, मसाला शेंगा,डाळिंब,गावरान पेरू, कच्चे शेंगा आणि जेवण बनविण्यासाठी जिजाऊ महिलामहिला बचत गटातील महिला टीम विविध खाद्य पदार्थ बनविण्यासाठी जाणार आहेत दिल्लीत सोलापुरी ठेचा,शेंगा पोळी,धपाटे, चुलीवरचे भाकरी,बाजरी भाकरी, मिलेट रोटी,मसाला रोटी,बाजार आमटी,बेसन पिटला,पेंडपाला,रान भाजी,संक्रांत स्पेशल तिळ गुळ,ज्वारी बाजरी उंडे,पालक कढधान्य भाज्या,बाजार आमटी,मेजवानी देणार असल्याचे अस्सल सोलापुरी पाहुणचार संचालिका सौ संगीता भतगुणकी यांनी सांगितले.

शेतांमध्ये ज्याप्रमाणे शेकोटीवर हुरडा भाजून आनंद साजरा केला जातो, तसाच अनुभव येथे दिला जाणार आहे हुरड्यासोबतच खमंग लसूण चटणी, स्वीटकॉर्न,शेंगदाणा कूट, पिवळाधमक गूळ, साजूक तूप, ताक आणि चुलीवरचे वाफाळलेले पिठलं-भाकरी,भरीत भाकरी, बटाटेवडा, भजी सोबतच ऊस, बोरं, ओला हरबराअशा अस्सल गावरान पदार्थांची रेलचेल येथे असणार आहे.थंडी, शेकोटीची ऊब आणि संगीत मैफिलीत हुरड्याचा आस्वाद, असा दुग्धशर्करा योग या निमित्ताने जुळून येणार आहे. याबरोबरच संक्रात वाणासाठी महिलांनी बनविलेल्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

शहर आणि गाव यांना जोडणारा हा भावनिक पूल दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या अधिक जवळ घेऊन जाणारा ठरणार आहे. ९ ते ११ जानेवारी दरम्यान नवीन महाराष्ट्र सदन येथे होणाऱ्या या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्राच्या आदरातिथ्याचा आणि चवीचा आनंद घ्यावा, असे आवाहन निवासी आयुक्त आर विमला आणि गुंतवणूक निवासी आयुक्त सुशील गायकवाड यांनी केले आहे.

अस्सल सोलापुरी हुरडा पार्टी साठी सोलापूर हून हुरडा उत्पादक शेतकरी परमेश्वर भतगुणकी, सतीश पाटील ,विजयकुमार कांबळे आणि राजमाता जिजाऊ बचत गटाचे सौ कस्तुरी पाटील, राजश्री बगले,सौ भारती बिराजदार,सौ शान्नमा हिरापूरे आदी महिला जाणारा आहे.

एकूण ५००० लोकांना पुरेल इतके साहित्य व ३०० किलो हुरडा सलग तीन दिवस मेजवानी असणार आहे,

विमानाने हुरडा घेऊन ३ शेतकरी जाणार दिल्लीतील हुरडा पार्टीला ९१ वर्षीय श्री गुरुशांत भतगुणकी आपल्या बसव संगम शेतकरी गटातील हुरडा उत्पादक शेतकऱ्यांना व हुरडा चोलणारे ५० वर्ष अनुभवी शेतकरी सोबत जाणार आहेत.

दिल्लीतील हुरडा पार्टीत लोकांना पार्सल सुविधा उपलब्ध असून ऑर्डर साठी संपर्क काशीनाथ भतगुणकी मो ९८९०९४८३८८

नवी दिल्ली येथील हुरडा पार्टी साठी सोलापूर येथील ड्रीम फाउंडेशन व बसव संगम शेतकरी गट व जिजाऊ महिला बचत गट टीमला जिल्हा कृषी विभाग,जिल्हा प्रशासन, डीआरएम सोलापूर रेल्वे विभाग,हुरडा उत्पादक शेतकरी, यशस्विनी ॲग्रो प्रो कंपनी,अस्सल ड्रीम सोलापुरी पाहुणचार टीम यांचे सहकार्य मिळाले आहे.

---

# पत्रकार दिनानिमित्त अक्कलकोट तालुक्यातील पत्रकारांचा नूतन नगरसेवक सद्दाम शेरीकर मित्र परिवारातर्फे सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : ६ जानेवारी पत्रकार दिनानिमित्त लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकार बांधवांचा नगरसेवक सद्दाम शेरीकर मित्र परिवारातर्फे अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधवांचा पेन,वही व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

एस एस सोशल ग्रुप चे संस्थापक तथा नुतन नगर सेवक सद्दाम शेरीकर यांच्या हस्ते अक्कलकोट शहरातील जेष्ठ पत्रकार बाबा निंबाळकर याना पेन वही व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व दैनिक यश सिद्धी न्यूजचे संपादक कमलाकर सोनकांबळे, रविकांत धनशेट्टी, महेश गायकवाड, गौतम बाळशंकर, स्वामीराव गायकवाड, राजेश जगताप, चेतन जाधव अभिजित पत्की, योगेश कबाडे, नंदकुमार जगदाळे, रमेश भंडारी,शिवानंद फुलारी, शिवानंद याळवार, बसवराज बिराजदार, अरविंद पाटील, रियाज सय्यद, रेवणसिध पुजारी, सयद्दपा इंगळे, महादेव जंबगी, आंबुरे, शिवलाल राठोड, सोहेल फरास आधी पत्रकार बांधवांचा पेन वही व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

शेवटी एस एस सोशल ग्रुप व सद्दाम शेरीकर मित्र परिवारातर्फे आलेल्या सर्व पत्रकार बांधवांचा सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी अकिब शेरीकर,मुजम्मिल मुजावर, बाबा मुजावर, अझर जंगी, साहेबलाल तांबोळी, अब्दुल हनान अत्तार, सैपन काझी, जाकीर तांबोळी, सोहेल फरास व एस एस सोशल ग्रुप चे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथील प्रशिक्षणार्थींचा 'जय हिंद' साखर कारखाना आचेगाव येथे अभ्यास दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे कर्तबगार प्राचार्य मा.श्री हरिदास साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे कर्तव्यदक्ष प्रभारी प्राचार्य मा. श्री काशीद सर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील जोडारी वरिष्ठ विभागातील प्रशिक्षणार्थी हे केवळ खोलीच्या चार भिंतीच्या बंधनात न राहता आपल्या प्रशिक्षणार्थी कुशल व स्वयंपूर्ण बनावा, अभ्यासा बरोबरच प्रत्यक्षात प्रॅक्टीकल ज्ञान मिळावे. ह्या हेतूने जय हिंद साखर कारखान्यावर ON The Job Training साठी जोडारीचे निदेशक दिनेश मंठाळे सर यांच्या मार्गदर्शनातून पार पडली.



कारखान्यातील वेगवेगळी मशिनरी, प्रोसेसिंग युनिटचा प्रत्यक्षात अभ्यासासह सादरीकरण दाखवण्यात आले. OJT मध्ये प्रशिक्षणार्थी मोठ्या उत्साहाने १२ दिवस सहभागी होते. यावेळी जय हिंद साखर कारखाना चे व्हाईस चेअरमन श्री पाटील साहेब व सुपरवायझर श्री तल्ले सर व कर्मचारी वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले.

---

# कळंब येथे दिनेश मंडलिक यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : येथील उपविभागीय कार्यालयातील कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष महसूल सहाय्यक अधिकारी मा. दिनेश गोरख मांडलिक यांचा वाढदिवसानिमित्त कळंब येथील उपविभागीय कार्यालयात सेतू सुविधा केंद्र संचालक व मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने वाढदिवसा निमित्त सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे,सेतु सुविधा केंद्र संचालक नटराज गायकवाड, सुनील पाटोळे, दीपक दळवी, बाबासाहेब टोपे, कर्मचारी धनराज पिसुरे, बबन जाधवर यांच्या सह नागरीक उपस्थित होते.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व वसुंधरा कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर व वसुंधरा कला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागृती निर्माण करणे, महिला व बालहक्कांबाबत जनजागृती करणे तसेच सायबर गुन्हयांपासून संरक्षणाबाबत मार्गदर्शन करणे हा होता.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्यायाधीश प्रशांत पेठकर यांनी मार्गदर्शन करताना सावित्रीबाई फुले यांचे कार्य ही वैचारिक क्रांती असल्याचे सांगितले. शिक्षित व सुज्ञ महिलांमुळे समाजात नैतिकतेचे संस्कार रुजतात आणि सामाजिक समतेचे वातावरण निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले. हक्क व अधिकारांचा वापर करताना कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सोशल मीडियाच्या गैरवापरामुळे गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून युवकांनी सतर्क राहून आपल्या करिअरकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात ॲड. अनुराधा कदम यांनी मनोधैर्य योजनेबाबत मार्गदर्शन केले. पीडितांना शासनाकडून मिळणारी आर्थिक मदत, संरक्षण व कायदेशीर आधार याविषयी त्यांनी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात सहायक लोकअभिरक्षक सिद्धाराम म्हेत्रे यांनी चाइल्ड फ्रेंडली लीगल सर्व्हिसेस स्कीम २०२४ याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सायबर क्राईम जागृती सत्रात श्रीमती अंजली काळे यांनी सोशल मीडियाच्या आमिषाला बळी पडून होणाऱ्या फसवणुकीबाबत सावध राहण्याचे आवाहन केले. सतर्कता आणि जागरुकताच सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणाचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा योग्य व सकारात्मक वापर करावा असे सांगितले. महापुरुषांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, सामाजिक बंधुभाव जपावा आणि न्यायव्यवस्था टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजिका डॉ. संगीता भोसले यांनी केले. आभार डॉ. अशोक पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन कु. रेश्मा सुर्वे यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर चे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवेच्या कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

---

### कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या वागदरी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात प्रतिपादन

# स्वयंसेवकांनी समाज परिवर्तनाची चळवळ गतिमान करावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सामाजिक विचार झपाट्याने बदलत आहेत, उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संघटनेवर टीका करणाऱ्यांची संख्या देखील वाढली आहे, अशा स्थितीत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी समाजाचे विचार प्रगल्भ करण्यासाठी चळवळ उभी केली पाहिजे, श्रमदानाच्या माध्यमातून चळवळ गतिमान करावी असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वागदरी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचा शुभारंभ करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपसरपंच पंकज सुतार होते. व्यासपीठावर संस्था सचिव मल्लिकार्जुन मसुती, प.पू. शिवलिंगेश्वर महास्वामीजी, किरनळ्ळीचे सरपंच संगीता भंडारे, धोंडप्पा यमाजी, प्रदीप जगताप, कमलाकर सोनकांबळे, हनीफ मुल्ला, शिवराज पोमाजी, बापूराव चव्हाण, प्रदीप पाटील आदी उपस्थित होते.



**कल्याणशेट्टी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा शुभारंभ करताना मल्लिनाथ कल्याणशेट्टी व मान्यवर.**

पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारण, पडीक जमीन लागवड, श्रमदान, उत्पन्नाचे स्त्रोत आदीबाबत स्वयंसेवकांनी प्रबोधन केले पाहिजे, यामुळेच समाजपरिवर्तन जलद गतीने होण्यास मदत होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन बापूजी चव्हाण व समर्थ पवार यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा राजेश पवार यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा शितल झिंगाडे भस्मे, प्रा मधुबाला लोणारी यांनी प्रयत्न केले.

# पत्रकारिता हा व्यवसाय नसून सामाजिक बांधिलकी व जबाबदारी आहे : उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पहिल्याच प्रयत्नात यु पी एस सी मध्ये पास होऊन पहिली पोस्टिंग विठ्ठलाच्या चरणी मिळाली यात खूप समाधान वाटले.पत्रकारिता दिन साजरा करताना मला सांगावस वाटते की पत्रकारिता हा व्यवसाय नसून ती एक सामाजिक जबाबदारी आहे.आपण जे युनिव्हर्सला मागू ते मिळते हा एक आकर्षणाचा नियम आहे.तसे आपल्या कार्यात यश मिळण्यासाठी आपण सकारात्मक प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी पत्रकार दिनानिमित्त कार्यक्रमात केले. आपल्या प्रशिक्षण काळात अमरावती येथील जादूटोणा आणि आदिवासी जिवन,जलद पसरणाऱ्या अफवा याबाबत आलेले अनुभव कथन केले.

सदर कार्यक्रम प्रसंगी पंढरपूर नगरपालिका मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी पत्रकारांना घरकुल योजने बाबत सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण वृत्तपत्रादिना निमित्ताने पत्रकार दिन कार्यक्रमाचे पंढरपूर पत्रकार संघ व सर्व नऊ संघाच्या वतीने एकत्रित आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष सूचना श्री राजेंद्र कोरके पाटील यांनी मांडली, अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार नंदकुमार देशपांडे होते.याप्रसंगी सर्व नूतन अध्यक्ष व पदाधिकारी यांचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख मान्यवरांचे स्वागत अमोल कुलकर्णी यांनी केले तर प्रास्तविक प्रवीण नागणे यांनी केले.महेश खिस्ते,हरिभाऊ प्रक्षाळे, श्रीकांत कसबे यांची मनोगते झाली.आभार सतीश बागल यांनी मानले.

# पुण्यातील 'आयआयसी प्रादेशिक मेळावा २०२५' मध्ये स्वेरीची उल्लेखनीय कामगिरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- पुण्यातील सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एसआयटी) मध्ये दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी 'आयआयसी प्रादेशिक मेळावा २०२५' चे आयोजन केले होते. त्यात गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) ने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यामुळे स्वेरीच्या स्टाफचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'आयआयसी प्रादेशिक मेळावा २०२५' मध्ये स्वेरीला 'बेस्ट आयआयसी पोस्टर पुरस्कार' आणि 'बेस्ट इनोव्हेशन अम्बॅसेडर (आयए) पुरस्कार' असा दुहेरी मान मिळाला आहे. हे दोन्ही पुरस्कार प्रतिष्ठेचे असल्यामुळे स्वेरीला प्रादेशिक स्तरावर विशेष गौरव प्राप्त झाला आहे. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखालील ही कामगिरी स्वेरीतील इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) च्या सातत्यपूर्ण व प्रभावी कार्याची साक्ष देणारी आहे. शिक्षण मंत्रालयाच्या 'इनोव्हेशन सेल'च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयआयसी अंतर्गत नवोन्मेष जागृती कार्यक्रम, कल्पनासर्जन (आयडीएशन) कार्यशाळा, बौद्धिक संपदा (आयपी) विषयक मार्गदर्शन, स्टार्ट-अप व इन्क्युबेशन केंद्र भेटी, तज्ज्ञ व्याख्याने, इनोव्हेशन स्पर्धा तसेच मेंटर-मेंटी उपक्रम यांचे नियमित आयोजन करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांचा विद्यार्थ्यांवर सकारात्मक व ठोस परिणाम दिसून येत असून विद्यार्थ्यांचा नवोन्मेष उपक्रमांतील सहभाग वाढला आहे. विद्यार्थ्यांकडून प्रकल्प व प्रोटोटाइप विकसित करणे, बौद्धिक संपदा नोंदणी, विविध नवोन्मेष स्पर्धांमध्ये सहभाग तसेच उद्योजकतेकडे वाटचाल करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२०' च्या उद्दिष्टांनुसार समाजोपयोगी व शाश्वत उपाययोजनांवर आधारित नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. 'बेस्ट आयआयसी पोस्टर पुरस्कार' हा महाविद्यालयाच्या नवोन्मेष प्रवासाचे प्रभावी सादरीकरण, उपक्रमांची सुस्पष्ट मांडणी व मिळवलेल्या यशाची दखल घेऊन प्रदान करण्यात आला, तर 'बेस्ट इनोव्हेशन ॲम्बेसडर पुरस्कार' हा विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष संस्कृती रुजवण्यासाठी केलेल्या नेतृत्वपूर्ण व सातत्यपूर्ण योगदानासाठी प्रदान करण्यात आला. हे पुरस्कार स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या नवोन्मेष, संशोधन व उद्योजकता क्षेत्रातील वचनबद्धतेची पुनः पुष्टी करतात आणि भविष्यात अधिक प्रभावी, विद्यार्थी-केंद्रित नवोन्मेष उपक्रम राबवण्यासाठी प्रेरणा देतात. या 'आयआयसी प्रादेशिक मेळावा २०२५' मध्ये उत्कृष्ठ सादरीकरण केल्याबद्धल डॉ. दिग्विजय रोंगे यांना सिम्बॉयसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या शिक्षण उपसंचालिका डॉ. दिपाली व्होरा यांच्या हस्ते सन्मानित केले गेले. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग विद्यार्थी व पालकांनी प्रा. दिग्विजय रोंगे यांचे अभिनंदन केले आहे.

# आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते सूर्यनारायण देवाची पूजा संपन्न

## महाराष्ट्रातील हजारो भाविक येतात दर्शनासाठी; महिनाभर चालते जत्रा



**नारायण चिंचोली येथील सूर्यनारायण देवाच्या यात्रेनिमित्त निघणाऱ्या पालखी सोहळ्या निमित्त पंढरपूरच्या नगराध्यक्ष सौ .प्रणितीताई भगीरथ भालके, पांडुरंग सह. साखर कारखान्याचे माजी व्हॉ.चेअरमन वसंतनाना देशमुख, विठ्ठल सह.साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी .वाय .मुजावर, शिवसेना शिंदे गटाचे ग्राहक संरक्षण तक्रार निवारण विभागाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख नितीन काळे, ए.पी.आय. शहाजी गोसावी आदी मान्यवराची प्रमुख उपस्थिती लाभली.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथील सूर्यनारायण देवाची यात्रा सुरू असून ही यात्रा पौष महिन्यातील संपूर्ण महिनाभर चालते या यात्रा काळात संपूर्ण जिल्ह्यास महाराष्ट्रातील हजारो भाविक भक्त मोठ्या भक्ती भावाने नारायण चिंचोली येथे असतात नारायण चिंचोली येथील सूर्यनारायणाचे मंदिर हे पुरातन असून या मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडी असून अत्यंत दुर्मिळ असे महाराष्ट्रातील एकमेव असे पुरातन हेमाडपंथी मंदिर आहे या यात्रा काळात संपूर्ण तालुक्यासह जिल्ह्यातील नेतेमंडळी दर्शनासाठी येत असतात यातच माढा तालुक्यात समाविष्ट असणाऱ्या तीर्थक्षेत्र नारायण चिंचोली येथे आज माढा तालुक्याचे विद्यमान आमदार अभिजीत धनंजय पाटील यांनी नारायण देवाची विधीवत पाद्य पूजा करत सूर्यनारायण देवाचे आशीर्वाद घेतले यावेळी ग्रामस्थसह आमदार अभिजीत पाटील यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अतुलभैय्या चव्हाण, विठ्ठल नाना रणदिवे, तानाजी सालविठ्ठल, लक्ष्मण कोले, अभिजीत कवडे, नवनाथ कोले, महेश गुंड, धनाजी पासले, बाबासो मुलानी, उमेश दाढे, अनुप मोरे, दिगंबर शिंदे, रवींद्र ठवरे, शिवाजी सलगर आदी मान्यवर विठ्ठल परिवार व रयतेचा राजा प्रतिष्ठान चे पदाधिकारी उपस्थित होते.

# सैनिक स्कूल तुळजापूर येथे दृष्टी दोष प्रकाराबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील काही दृष्टी दोष असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना साधन व्यक्ती श्रीमान कसबे सर यांनी विशेष मार्गदर्शन केले.

आज दि. ०६/०१/२०२५ रोजी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, संचलित श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालय मध्ये विद्यार्थ्यांची तपासणी केली असताना दृष्टीदोष प्रकारातील काही विद्यार्थी शिकत असताना लिहिण्यासाठी व वाचनासाठी त्यांना अडचणी येत होत्या या विध्यार्थ्यांना त्यांच्या शारिरीक व मानसिक गरजांनुसार शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात अधिक प्रभावी व्यक्तिमत्व सामावून घेण्यासाठी त्यांच्या दृष्टीदोष प्रकाराबाबत त्यांना साधन व्यक्ती श्री कसबे सर यांच्या मार्फत विशेष मार्गदर्शन आणि प्रोत्साहनपर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यालयातील सर्व विध्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# रांजणी येथील जिल्हा परिषद शाळेला कॉम्प्युटर पुस्तके भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद शाळेला संगणक, पुस्तके, दिनदर्शिका यांची भेट गावातील नागरिक मदन मनोहर बनसोडे यांनी त्यांची नाती कु. आर्या सुरेंद्र बनसोडे, हीच्या वाढदिवसानिमित्त शाळेस भेट देण्यात आली. तर कु.शोहेब मतीन पटेल यांच्या वाढदिवसा निमित्त मतीन पटेल यांनी वाचनालयासाठी पुस्तके भेट दिली. तसेच प्रदीप ठोंबरे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना दिनदर्शिका भेट दिली. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष इलाही पटेल, उपाध्यक्ष माणिक गायकवाड, सरपंच राजाभाऊ आगरकर, उपसरपंच अन्सार शेख, ग्रामपंचायत सदस्य अलीम भाई शेख, नाना गायकवाड ,तंटामुक्ती अध्यक्ष मतीन पटेल , चेअरमन प्रल्हाद गोरे, प्रदीप ठोंबरे, लतीब पटेल, जानू मिया बागवान, सुरेंद्र बनसोडे शिक्षक व पालक मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# मातंग एकता आंदोलनच्या वतीने क्रांतीकन्या मुक्ता साळवे यांची जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाजवळ आद्य क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांची पुतणी व महात्मा फुले सावित्रीमाई फुले यांच्या पहिल्या विद्यार्थीनी क्रांतीकन्या मुक्ता साळवे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन नगरसेवका सुवर्णा रोहिदास आलाट यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मातंग एकता आंदोलन चे तालुका अध्यक्ष शरद भैय्या पवार व नगरसेवक रोहिदास आलाट यांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करण्यात आला. शहराध्यक्ष युवराज जगताप यांनी मुक्ता साळवे यांच्या निबंध व कार्याचा आढावा समाज बांधवास सांगितला. यावेळी संघटनेचे पदाधिकारी विश्वराज आलाट, चेतन आलाट, बाबा करंडे, अभिजित मंडलिक, करण आलाट, दयानंद करंडे, बाळासाहेब आलाट, पांडुरंग जगताप, उध्दव आलाट, गणेश आलाट , सोनू आलाट, सागर आलाट, कमलेश आलाट उपस्थित होते.

# आतकोली येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला हॉलचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील भादाणे ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आतकोली येथे जिल्हा विकास निधीतून बांधण्यात आलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला हॉलचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या उत्साहात पार पडले. या महिला हॉलमुळे ग्रामीण भागातील महिलांना विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांसाठी स्वतंत्र व सुसज्ज व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या महिला हॉलचे उद्घाटन शिवसेना



उपनेत्या ज्योतीताई ठाकरे व शिवसेना उपनेते विश्वासजी थळे यांच्या हस्ते तर शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाशजी भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे हे महिला हॉल महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे केंद्र ठरेल, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

उद्घाटनप्रसंगी प्र. सरपंच मेघा भोईर, सरपंच जोस्ना भालेकर, भास्कर माळी, रमेश शेलार, राजेंद्र काबाडी, प्रमिलाताई भोईर, संजयभाई पटेल, रुपेश कडूसकर, अनंता राऊत, सुरेंद्र शेलार, हरेश राऊत, मधुकर राऊत, मारुती शेलार, विजय भोईर, प्रदीप भोईर, संजय राऊत, संतोष शेलार, योगेश भोईर, रविंद्र पाटोळे, रवींद्र भोईर, संदीप महाराज भोईर, चिंतामण भोईर, रविंद्र निपुत्रे, नीरज निपुत्रे, राजाराम शेलार, मधुकर राऊत, कुणाल भोईर, महेश भोईर तसेच ग्रामपंचायत भादाणे सदस्य नितीन शेलार, वंदना काशिनाथ शेलार, दर्शना दिनेश ठाकरे, विमल रमेश वाघे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

या महिला हॉलमुळे गावातील महिलांना सभा, प्रशिक्षण, बचत गटांच्या बैठकांपासून ते विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज जागा उपलब्ध होणार आहे. सावित्रीबाई फुले यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या या हॉलमुळे महिला शिक्षण, सशक्तीकरण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला चालना मिळेल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

'दर्पण' कार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

पत्रकार बांधवांचा केला सन्मान

# पत्रकारिता समाजाला दिशा देण्याचे माध्यम : प्रांताधिकारी सचिन इथापे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पत्रकारिता केवळ बातम्या देण्याची प्रक्रिया नाही तर समाजाला दिशा देण्याचे प्रभावी माध्यम आहे. पत्रकार समाजाचे मार्गदर्शक दीपस्तंभ आहेत आणि लोकशाहीचा पाया मजबूत करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. असे मत प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी व्यक्त केले

दिनांक ०६ जानेवारी रोजी राज्यात सर्वत्र मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्याच अनुषंगाने जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर अधिनस्त उप माहिती कार्यालय पंढरपूर येथे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी पंढरपूर तालुका व शहरातील विविध माध्यमांचे संपादक, प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी श्री इथापे म्हणाले, पत्रकारितेत पूर्वी केवळ छापील वृत्तपत्र असायचे आता दूरचित्रवाहिन्यांची संख्या मोठी झाली आहे. तसेच समाज माध्यमांचा वापर वाढला आहे. दिवसभर माध्यमावर एखादी घटना सतत ऐकूनही सकाळी वर्तमानपत्राच्या पानावर ते वृत्त वाचण्यासाठी असलेली ओढ अजूनही समाजात आहे. वर्तमानपत्रातील अग्रलेखांनी सरकारमध्ये उलतापालथ केली आहे. समाज सुधारण्यासाठी वर्तमानपत्र गरजेचे आहे. जे समाज सुधारक होऊन गेले त्यांनी पहिले वर्तमान पत्र काढले. समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक कुप्रथा विरुद्ध लेखन केले. ब्रिटिश काळात लोकांना स्वातंत्र्य, न्याय आणि समानतेची जाणीव करून त्यांच्यामध्ये राष्ट्रीय चेतना जागृत केली. समाजाचा आवाज मांडण्याचे माध्यम हे पत्रकारिता आहे. विधानसभेत जसा शिक्षक मतदार संघ आहे तसा पत्रकार मतदार संघ असावा एवढे मोठे कार्य पत्रकारांनी केले असल्याचेही प्रांताधिकारी श्री इथापे यांनी सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक अमोल कुलकर्णी यांनी केले.

**दर्पण' कार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन**

उप माहिती कार्यालय पंढरपूर येथे आज दिनांक ६ जानेवारी 'पत्रकार दिनानिमित्त' आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी पत्रकारितेकडे समाजाचे प्रबोधन आणि शासन व प्रशासनावर अंकुश ठेवण्याचे माध्यम म्हणून पाहिले जाते. दैनंदिन जीवनामध्ये घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब समाज्यांमध्ये उमटत असते. लोकशाहीत चतुर्थ स्तंभ हा महत्त्वाचा आहे. आणि या चतुर्थ स्तंभाला बळ देणारा आजचा दिवस असल्याचे सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे सांगितले.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती पंढरपूर शहरात विविध कार्यक्रमाने संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती संत पेठ भागातील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ समोर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मा.आ. प्रशांत परिचारक व पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष सौ. प्रणिता ताई भालके यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी पंढरपूर नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्ष सौ साधनाताई भोसले, नगरसेवक अमोल डोके व त्या भागातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग कृषी सेवा मुख्य परिक्षा २०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत साठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे,मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग कृषी सेवा मुख्य परीक्षा-२०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीच्या तयारीसाठी एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखत परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. १०,०००/- एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग कृषी सेवा मुख्य परीक्षा-२०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत घोषित केला आहे. सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग कृषी सेवा मुख्य परिक्षा २०२४ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत. पात्र असलेल्या उमेदवारांना एकरक्कमी रक्कम रु. १०,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थे मार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in > NOTICEBORD > Maharashtra Public Service Commission Agriculture Interview Exam - 2024 येथे भेट द्यावी.